2024 X 24 0900 Seat No. [ ][ ]

DIV : [ ]

Time : 3 Hours **MARATHI**

Subject Code

| N | 1 | 1 | 3 | 3 |
|---|---|---|---|---|

**Total No. of Questions : 57 (Printed Pages : 16) Maximum Marks : 80**

**सूचना :**

- **प्रश्न क्रमांक स्पष्टपणे लिहावेत.**
- **उजवीकडील अंक गुण दर्शवितात.**
- **प्रश्नपत्रिकेचे दोन भाग आहेत.**
- **भाग एक — बहुपर्यायी प्रश्न (प्रश्न क्र. 1 ते 40) (MCQ – 40 Marks)**
- **भाग दोन — व्यक्तिनिष्ठ प्रश्न (प्रश्न क्र. 41 ते 57) (Subjective – 40 Marks)**

**भाग एक - बहुपर्यायी प्रश्न (MCQ – 40 Marks)**

**पुढील प्रश्नांखाली दिलेल्या पर्यायांपैकी अचूक पर्याय निवडून लिहा.**

1. लेखकाला मेणबत्तीच्या थंड प्रकाशात : 1

(A) लिहीत बसणे आवडते

(B) वाचीत बसणे आवडते

(C) संगीत ऐकणे आवडते

(D) शांत बसून राहणे आवडते

2. डॉ. लोहिया मडगावच्या स्टेशन रोडवरील : 1

(A) रिपब्लिक हॉटेलमध्ये येऊन राहिले होते

(B) नॅशनल हॉटेलमध्ये येऊन राहिले होते

(C) ताज हॉटेलमध्ये येऊन राहिले होते

(D) मडगाव रेसिडन्सीमध्ये येऊन राहिले होते

3. अभ्यासाच्या नावाखाली बंड्या काय करायचा ? 1

(A) श्लोक म्हणायचा

(B) पतंग उडवायचा

(C) चित्रे काढायचा

(D) गोष्टींची पुस्तके वाचायचा

4. लेखकाला दूध घालण्याचा मोबदला म्हणून काय मिळत असे ? 1

(A) रोज अर्धा लिटर दूध प्यायला मिळत असे

(B) रोज जेवायला मिळत असे

(C) शिक्षणाचा खर्च मिळत असे

(D) रोज चहा व नाश्ता मिळत असे

5. ज्याच्यामधी नहीं चेव त्याले : 1

(A) भक्ती म्हनू नही

(B) शक्ती म्हनू नही

(C) लेक म्हनू नही

(D) नेक म्हनू नही

6. भल्या सकाळी उन्हात न्हाऊ, ऐन दुपारी ............... पोहू. 1

(A) डोहात

(B) नदीत

(C) पऱ्ह्यात

(D) तळ्यात

7. संत तुकारामांच्या मते कोणती गोष्ट अमंगळ आहे ? 1

(A) भेदाभेद

(B) मत्सर

(C) असत्य

(D) दुःख

8. बाजारात कोणती वस्तू विकत मिळत नाही असे संत मुक्ताबाई सांगतात ? 1

(A) कौशल्य

(B) भक्ती

(C) सुख

(D) ज्ञान

9. जीव पाखडणे म्हणजे : 1

(A) धडपड करणे

(B) मेहनत करणे

(C) जीव नकोसा होणे

(D) जीव तळमळणे

10. 'डोक्याला हात लावणे' या वाक्प्रचाराच्या उपयोगाचे खालीलपैकी कोणते वाक्य बरोबर आहे ? 1

(A) अवेळी पाऊस थांबल्याने शेतकऱ्याने डोक्याला हात लावणे

(B) अवेळी पाऊस थांबल्याने शेतकरी निराश झाला

(C) अवेळी पाऊस थांबल्याने शेतकऱ्याने डोक्याला हात लावला

(D) अवेळी पाऊस थांबल्याने शेतकरी निराश होणे

11. मी जबरदस्त धागडधिंगा घातला. या वाक्यातील 'जबरदस्त' : 1

(A) उभयान्वयी अव्यय

(B) शब्दयोगी अव्यय

(C) केवलप्रयोगी अव्यय

(D) क्रियाविशेषण अव्यय

12. आबा आणि नाऱ्या घरी गेले. या वाक्यातील 'गेले' : 1

(A) नाम
(B) सर्वनाम
(C) विशेषण
(D) क्रियापद

13. 'गरीब' या शब्दाचे भाववाचक नाम : 1

(A) गरीबपणा
(B) गरीबगिरी
(C) गरिबी
(D) गरीबता

14. डोंगरउतारावर लांब मोर उतरले होते. या वाक्याचा काळ : 1

(A) अपूर्ण भूतकाळ

(B) पूर्ण भूतकाळ

(C) साधा भूतकाळ

(D) अपूर्ण भविष्यकाळ

15. आज बडोद्याहून मी मुंबईस जात आहे. या वाक्याचा काळ : 1

(A) साधा वर्तमानकाळ
(B) पूर्ण भूतकाळ
(C) पूर्ण वर्तमानकाळ
(D) अपूर्ण वर्तमानकाळ

16. 'विस्मय' या शब्दाचा समानार्थी शब्द : 1

(A) आश्चर्य
(B) विस्मरण
(C) विनम्र
(D) विसर

17. 'फर्मान' या शब्दाचा समानार्थी शब्द : 1

(A) सूचना
(B) हुकूम
(C) सल्ला
(D) विनंती

18. 'शाश्वत' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द : 1

(A) सशाश्वत
(B) प्रशाश्वत
(C) अशाश्वत
(D) निशाश्वत

19. 'मित्र' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द : 1

(A) पाहुणा
(B) सोयरा
(C) दोस्त
(D) शत्रू

20. खालीलपैकी कोणते वाक्य शुद्ध आहे ? 1

(A) लोकांचा जमाव वाढत राहिला

(B) लोकांचा जमाव वाडत राहिला

(C) लोखांचा जमाव वाढत राहिला

(D) लोकांचा झमाव वाढत राहिला

21. खालीलपैकी कोणते वाक्य शुद्ध आहे ? 1

(A) सहसा अंतराय होऊ द्यायच नाहीत

(B) सहसा अंटराय होऊ द्यायचे नाहीत

(C) सहसा अंतराय होवू द्यायचे नाहीत

(D) सहसा अंतराय होऊ द्यायचे नाहीत

**पुढील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य विरामचिन्ह निवडा.**

22. वा रे वा ................ मी अभ्यास करतोय म्हटलं! 1

(A) ?

(B) !

(C) –

(D) .

23. 'पारायण' म्हणजे : 1

(A) पुन्हा पुन्हा लिहिणे

(B) पुन्हा पुन्हा बोलणे

(C) पुन्हा पुन्हा वाचणे

(D) पुन्हा पुन्हा ऐकणे

24. 'तर्क करता येणार नाही' म्हणजे : 1

(A) अतर्क्य

(B) वितर्क्य

(C) सतर्क

(D) उतर्क

**पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची अचूक उत्तरे निवडून लिहा.**

आपल्या प्राचीन ऋषींनी पाण्याला जीवन म्हटले आहे. किती सार्थ वाटतं हे नाव! त्यांच्या दिव्यचक्षूंना जलाशयाचे सुंदर रहस्य दिसले असावे. अन्नावाचून आपण अनेक दिवस जगू शकतो पण पाण्याशिवाय एक दिवसही जगणे कठीण जाते. दृश्य पाण्याचा शोध सारस पक्ष्याच्या अस्तित्वावरून घेता येतो. वन्य पशू पाण्याच्या अस्तित्वाविषयी मोठे संवेदनशील असतात. हत्तीचे उदाहरण घ्या. भूगर्भातील वाहणारे पाणी तो सहज धुंडाळून काढतो. अवर्षणाच्या काळात हत्तीचे अस्तित्व अरण्यातील इतर प्राणिमात्रांना वरदायी असते. तो आपल्या सामर्थ्यशील तीक्ष्ण सुळ्यांनी, नदी-नाले जिथे वळण घेऊन वाहतात, तिथला खोलगट भाग खोदतो. ज्या ज्ञानामुळे जमिनीखालील पाण्याची माहिती होते त्यास 'दकार्गल शास्त्र' म्हणतात. वराहमिहिराने 'बृहत्संहिता' ग्रंथात या शास्त्राविषयी सविस्तर माहिती दिली आहे. या शास्त्राचा अभ्यास करणाऱ्यास जांभूळ, उंबर, अर्जुन, बोर, पळस इत्यादी वृक्षांचे ज्ञान पाहिजे. तसेच त्या झाडांजवळील वारुळाच्या रचनेची माहिती पाहिजे. वारूळ खणत असता त्यात अनेक प्रकारचे साप आढळून येतात. बेडूक, घोरपडी व मुंगसांची निवासस्थाने दिसतात. विंचवाची वीण सापडते. या प्राण्यांच्या अस्तित्वावरून त्या झाडाजवळ

किती खोलवर पाणी सापडू शकेल याचा अंदाज करता येतो. अशारीतीने परिसरातील पाणी वाचणाऱ्यास पानाडी म्हणतात. व्हिएतनाम युद्धात व्हिएतनामी पानाड्यांनी जमिनीतील स्फोटक कवचे मोठ्या कुशलतेने शोधून काढण्याचे कार्य केले. जमिनीतील पाणी तसेच खनिजद्रव्ये शोधण्यासाठी पानाड्यांना उपयोग केला जातो. रशिया यामध्ये आघाडीवर आहे. भूगर्भातील उदकाच्या क्षेत्रात पानाड्यांना कित्येकवेळा चमत्कारिक अनुभव आले. अशा क्षेत्रात उंदीर, घुशी अस्वस्थ दिसल्या. सांबरशिंगे व रानडुकरे ही दोन्ही जनावरे जमिनीखाली गुप्त वाहणारे पाणी सहज धुंडाळून काढतात.

25. अवर्षणाच्या काळात हत्तीचे अस्तित्व अरण्यातील इतर प्राणिमात्रांना वरदायी ठरते कारण हत्ती : 1

(A) भूगर्भातील वाहणारे पाणी सहज धुंडाळून काढतो

(B) सर्व प्राण्यांना नवीन प्रदेशात जायला मदत करतो

(C) प्राण्यांना कमी पाणी वापरायची सूचना करतो

(D) वनातील पाण्याचे संरक्षण करतो

26. ज्या ज्ञानामुळे जमिनीखालील पाण्याची माहिती होते त्यास : 1

(A) जलार्ग शास्त्र म्हणतात

(B) दकार्गल शास्त्र म्हणतात

(C) उदकार्ग शास्त्र म्हणतात

(D) निसर्गशास्त्र म्हणतात

27. दृश्य पाण्याचा शोध .................. अस्तित्वावरून येतो. 1

(A) सारस पक्ष्याच्या

(B) विंचवाच्या

(C) घुशीच्या

(D) घोरपडीच्या

28. भूगर्भातील उदकाच्या क्षेत्रात पानाड्यांना कित्येकवेळा .................. अनुभव आले. 1

(A) विस्मयकारक

(B) चमत्कारिक

(C) आश्चर्यकारक

(D) नावीन्यपूर्ण

29. पानाड्यांचा उपयोग करून जमिनीतील पाणी तसेच खनिजद्रव्ये शोधण्यामध्ये कोण आघाडीवर आहे ? 1

(A) चीन

(B) व्हिएतनाम

(C) भारत

(D) रशिया

30. जमिनीखाली गुप्त वाहणारे पाणी कोण सहज धुंडाळून काढतात ? 1

(A) सांबरशिंगे व रानडुकरे

(B) घोरपडी व मुंगूस

(C) उंदीर व विंचू

(D) घुशी व साप

31. व्हिएतनामी पानाड्यांनी मोठ्या कुशलतेने जमिनीतून ............. शोधून काढण्याचे कार्य केले. 1

(A) सोन्याचे साठे

(B) पाण्याचे स्तर

(C) स्फोटक कवचे

(D) मौल्यवान रत्ने

32. ऋषींना काय दिसले असावे ? 1

(A) जलशास्त्राचे सुंदर रहस्य

(B) मानवी जीवनाचे रहस्य

(C) परोपकाराचे रहस्य

(D) जलाशयाचे सुंदर रहस्य

**पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची अचूक उत्तरे निवडून लिहा :**

व्यायामशाळांमधून आधुनिक उपकरणांद्वारे विविध प्रकारचे व्यायाम करण्याची सुविधा उपलब्ध असते. मात्र वेळेच्या अभावामुळे नियमित व्यायाम करणे राहून जाते. आजच्या धकाधकीच्या जीवनात माणूस तणावग्रस्त होतो. यावरती समस्याकेंद्रित तंत्र वापरून उपचार करता येतो. ज्यामध्ये विनोद करणे, सकारात्मक मूल्यांकन करणे, परोपकार करणे, आत्मपरीक्षण करणे यांचा समावेश होतो. जर वरील तंत्र वापरून यश आले नाही तर मानसिक अवरोध तंत्राचा उपयोग केला जातो. सदर तंत्रामध्ये श्रमपरिहार, मानसिक स्थानांतरण, मनोवृत्ती दडपणे, हद्दबंदी यांचा अंतर्भाव होतो. तणाव येण्याची

बाह्य कारणे असतात तशीच आंतरिक कारणेही असतात. घरात व कामाच्या ठिकाणी असलेले वाईट वातावरण, प्रकृती अस्वास्थ्य, कमकुवत आर्थिक स्थिती, सामाजिक समस्या यामुळे बाह्य तणाव निर्माण होतो. माणसाच्या स्वभावानुसार काहीवेळा त्याला आंतरिक तणावाचा सामना करावा लागतो. आत्मविश्वासाचा अभाव, हळवेपणा, स्वतःला कमी लेखणे, संवाद न साधता येणे ही आंतरिक तणावाची लक्षणे आहेत. स्वतःच्या शरीराच्या व मनाच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते. वेळ कमी व कामे जास्त अशी तक्रार खूपजण करतात. बदललेली जीवनशैली, कामाचा व्याप, वाढती स्पर्धा व असुरक्षितता, जीवनात घडणाऱ्या वाईट घटना अशा अनेक कारणांमुळे माणसाचे स्वास्थ्य बिघडते. अशा परिस्थितीत प्रत्येकाने रोज योगसाधना केली पाहिजे. भारतीय योगशास्त्रामध्ये पाच प्रकारचे योग सांगितले आहेत. ते म्हणजे ज्ञानयोग, हठयोग, कर्मयोग, भक्तियोग व राजयोग. ज्ञानाच्या आधारे आत्मतत्त्वाचे अखंड अनुसंधान करणे हा ज्ञानयोग आहे. हठयोगामध्ये विविध आसनांच्या आधारे चित्तवृत्तींची एकाग्रता टिकवली जाते. कर्मात कुशलता आणणे म्हणजे कर्मयोग. देवाची भक्ती करून त्याचे व स्वतःचे स्वरूप ओळखणे हा भक्तियोग आहे. राजयोगामध्ये मानवी मनाचा, स्वरूपाचा अभ्यास ध्यानाद्वारे केला जातो. योग करणाऱ्या माणसाने कसे वागावे याची माहिती देण्यात आली आहे. त्यांना 'यम' व 'नियम' असे म्हणतात.

सत्य, अहिंसा, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह हे पाच यम आहेत. पाच नियमांमध्ये शौच, संतोष, तप, स्वाध्याय व ईश्वर प्रणिधान यांचा समावेश होतो. योगासनात स्थिरता राखणे आवश्यक असते. प्राणायाम हे मनाच्या शांतीचे साधन आहे. प्रत्याहार मनाला भोगांपासून दूर ठेवतो. धारणा म्हणजे पूर्ण एकाग्रता गाठणे.

एकाग्रतेमध्ये स्थिर होणे हेच ध्यान होय. ईश्वराशी जोडले जाणे म्हणजे समाधी अवस्था आहे.

33. भारतीय योगशास्त्रामध्ये किती प्रकारचे योग सांगितले आहेत ? 1

(A) चार
(B) सहा
(C) पाच
(D) सात

34. मानवी मनाचा, स्वरूपाचा अभ्यास ध्यानाद्वारे करणे म्हणजे ................ 1

(A) हठयोग
(B) राजयोग
(C) भक्तियोग
(D) कर्मयोग

35. मानसिक अवरोध तंत्रामध्ये ............ अंतर्भाव होतो. 1

(A) परोपकाराचा
(B) सकारात्मक मूल्यांकनाचा
(C) विनोद करण्याचा
(D) हद्दबंदीचा

36. समस्या केंद्रित तंत्रामध्ये ................ समावेश होतो. 1

(A) श्रमपरिहाराचा
(B) मनोवृत्ती दडपण्याचा
(C) आत्मपरीक्षणाचा
(D) मानसिक स्थानांतरणाचा

37. आंतरिक तणावाचे ............... हे लक्षण आहे. 1

(A) प्रकृती अस्वास्थ्य

(B) स्वतःला कमी लेखणे

(C) कमकुवत आर्थिक स्थिती

(D) सामाजिक समस्या

38. मानसशास्त्रानुसार ................ बाह्य तणाव निर्माण होतो. 1

(A) हळवेपणामुळे

(B) संवाद न साधल्यामुळे

(C) आत्मविश्वासाच्या अभावामुळे

(D) घरात व कामांच्या ठिकाणी असलेल्या वाईट वातावरणामुळे

39. योगशास्त्रातील नियमांमध्ये खालीलपैकी कोणाचा समावेश होतो ? 1

(A) शौच

(B) सत्य

(C) अहिंसा

(D) ब्रह्मचर्य

40. योगशास्त्रानुसार ................ यम आहे. 1

(A) अपरिग्रह

(B) संतोष

(C) तप

(D) स्वाध्याय

## भाग दोन - व्यक्तिनिष्ठ प्रश्न (Subjective)

**खालीलपैकी कोणत्याही चार प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी दोन ते तीन वाक्यांत लिहा.** 8

41. दुसऱ्या मेणबत्तीच्या मनात शेवटी कोणते विचार आले असतील ?

42. लेखक शांताराम जाधव यांना त्यांच्या मोठ्या भावाने काय सांगितले ?

43. मडगावच्या महिलांनी कशाप्रकारे धैर्य दाखविले ?

44. मुलगा आपल्या घरच्यांची कोणकोणती कामे करतो ?

45. या राष्ट्राचे नंदनवन केव्हा बनू शकेल असे लेखकाला वाटते ?

**खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी चार ते पाच वाक्यांत लिहा.** 6

46. लिमये आणि चोरघडे सरांना सुरभीच्या घरचा कोणता अनुभव आला ?

47. दादुल्याने आपूला शाळेत नेण्याची तयारी कशी केली ?

48. ना.ग. गोरे यांनी साने गुरुजीच्या झुंजारवृत्ती विषयी काय सांगितले आहे ?

**खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी दोन ते तीन वाक्यांत लिहा.** 4

49. 'आई तुझ्याचसाठी' या कवितेत कवीच्या घरी दिवाळीला कसे वातावरण असते ?

50. हात व पाय या अवयवांजवळ कोणते गुण असावेत असे बहिणाबाई सांगतात ?

51. 'कोण्याही जीवाचा न घडो मत्सर' या ओळीतून संत तुकाराम काय सांगू इच्छितात ?

**खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी चार ते पाच वाक्यांत लिहा.** 6

52. तुमची शाळा व बिनभिंतीची शाळा यामध्ये कोणता फरक आहे ?

53. आपल्या कुटुंबासाठी कष्टणाऱ्या आईचे वर्णन कवितेत कसे केले आहे ?

54. 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा' या अभंगात मुक्ताबाईने ज्ञानेश्वरांना कोणता उपदेश केला आहे ?

55. खालील अपूर्ण गोष्ट **10** ते **12** ओळींत पूर्ण करून लिहा. सदर गोष्टीला योग्य शीर्षक लिहा. 5

राजापूर राज्यात जयसिंग राजा राज्य करीत होता. राज्यातील लोक कष्टाळू होते. मात्र जयसिंग राजा खूप आळशी होता. त्याचे राज्यकारभारावर लक्ष नव्हते. राजापूर राज्य वैभवशाली होते.

जयसिंग राजाच्या शत्रूंनी राजापूरची धनसंपत्ती लुटून न्यायचे ठरविले. त्यांनी राजापूर राज्यावर........

56. अमेय/अमया घाटे, पणसुले, काणकोण गोवा हा/ही बोर्डिंगमध्ये शिकावयास असलेल्या आपल्या लहान भावास (संजू) वाचनाचे महत्त्व पटवून देणारे पत्र लिहितो/लिहिते. या पत्राचा नमुना **दहा** ते **पंधरा** वाक्यांत लिहा. 5

57. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर **अठरा** ते **वीस** ओळींत निबंध लिहा : 6

- माझा गाव
- कचऱ्याची वाढती समस्या
- बेकार युवकाची आत्मकथा
- आमच्या शाळेचा शिपाई

## Rough Work